
# असे आपले आगरकर



पु. पां. गोखले

# असे आपले आगरकर

पु. पां गोखले

समाजभूषण बाबुराव गोखले स्मारक समिती,
पुणे विभाग

१९६८

Ase Aple Agarker

□

प्रकाशक
समाजभूषण बाबुराव गोखले
स्मारक समिती, पुणे विभाग,
२७३, शनिवार पेठ,
पुणे ४११०३०

□

© सर्व हक्क सुरक्षित

□

प्रकाशन दिनांक
५ सप्टेंबर १९९८

□

मुद्रक
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ,
पुणे ४११०३०

□

**मूल्य : १५/- रुपये**

## अनुक्रम

आगरकरांच्या गोष्टी / ५

आपल्याच शब्दांत आगरकर / २१

आगरकरांचा संदेश / २६

आगरकर चरित्र / २७

मनोमन आगरकर / २८

## जरा ऐकाल का?

*बाल मित्र आणि मैत्रिणींनो,*

*गोपाळ गणेश आगरकर हे महाराष्ट्राचे एक थोर पुरुष. त्यांनी महाराष्ट्राला इंग्रजी राज्याबरोबर येथे आलेली पश्चिमेकडची सुधारणा शिकविली, म्हणून आगरकरांना 'सुधारकाचार्य' म्हणतात. महाराष्ट्रातल्या मुलांना तरी ठाऊक हवे, आगरकर कसे होते ते! म्हणून 'असे आपले आगरकर' तुमच्या हाती देत आहे.*

कऱ्हाड

**– पु. पां. गोखले**

## दिसायला असे :

उंच, सडपातळ व फाटक्या अंगाचा हा गडी. पाणीदार डोळ्यांचा. लहानपणी मोठी शेंडी राखणारा; पण घेरा न ठेवणारा. बोलण्यात ठसकेबाज, वागण्यात मनमिळावू आणि लोकांच्या उपयोगी पडणारा. शब्दांपेक्षा अर्थाकडे लक्ष अधिक. वेळ फुकट दवडावयाचा नाही, उसने काढावयाचे नाही आणि दुसऱ्याच्या जिवावर जगावयाचे नाही, हे या गड्याचे व्रत.

## १. नर व वानर यांची लढत



आगरकरांचे गाव टेंभू; पण त्या टिकलीएवढ्या गावात शाळाच नव्हती, म्हणून पाच वर्षांचा गोपाळ कऱ्हाडास आला अन् भागवतांकडे म्हणजे आजोळी राहिला. सोय जाणील तो सोयरा. गोपाळाचा 'दत्तू मामा' बरोबरीचा. गोपाळ आगरकर व दत्तू भागवत हे मामा-भाचे शिकू

लागले. धूळपाटीपासून इंग्रजीची तीन बुके होईपर्यंत कऱ्हाडास शिकले; पण नुसते 'बुक एके बुक' करून नव्हे. सुट्टीची, फुरसतीची, करमणुकीची वेळ सापडली की, गोपाळ झाडावर चढायचा, हुतुतू खेळायचा, किंवा कृष्णा-कोयनांच्या संगमात डुंबायचा! एकदा अशीच सारी मित्रमंडळी नदीत डुंबून घरी परत येत होती. वाटेत घाटावर रत्नेश्वराचे देऊळ व त्याच्या जवळ लाल-लाल चिंचेचे झाड! मग काय विचारता? सगळ्यांच्या तोंडाला पाणी सुटले. सर्वांनी झाडावर चढून यथेच्छ चिंचा काढावयाचे ठरविले; पण पाहतात तो काय? झाडावर चांगली पाच-सहा वानरे ठाण मांडून बसलेली! खालून या मुलांनी कितीही दगड भिरकावले, तरी ती वानरे तेथून पाय काढीनात. तेव्हा, झाडावरच चढून वानरांना पिटाळून लावण्याचे गोपाळने ठरविले. गोपाळ झाडावर चढला; पण मनात आणले एक आणि ओढवले भलतेच! पळून जाण्याऐवजी एक दांडगा वानर गोपाळवरच चालून आला! त्याने धरली गोपाळची शेंडी! अन् झाली की त्या दोघांची लढत सुरू! "हुप् हुप्!", "चूप! चूप!!" असा भोवताली पोरांचा आणखी गलबला! त्यात मग तो हुपट वानरच तासाभराने कंटाळून पळून गेला; पण त्या तसल्या प्रसंगात गोपाळ घाबरला असता तर? त्याने कच खाल्ली असती तर? झाडावरून पडून त्याचा कपाळमोक्षच झाला नसता काय?

***

## २. *धिक्कार मन साहिना*

गोपाळ शिकत होता, तेव्हा कऱ्हाडास रावसाहेब अमृत श्रीपत नागपूरकर हे मुन्सफ होते. रविवारी ते एक सभा भरवीत. त्या सभेत जो मुलगा चांगला निबंध लिहून आणील, त्यास रावसाहेब रुपया-दोन रुपये बक्षीस देत. या चढाओढीत गोपाळचा निबंध एकदा फारच सरस ठरला. त्या वेळी कऱ्हाडला मामलेदार होते कृष्णाजी वासुदेव ऊर्फ अप्पासाहेब जोशी. ते नागपूरकरांच्या त्या सभेत म्हणाले, "असला चांगला निबंध मुलांना कोठून लिहिता येणार?" मामलेदारांचे ते भाषण गोपाळला खपले नाही. त्याचा स्वाभिमान जागृत झाला.

गोपाळने सणसणीत जबाब दिला व सवाल केला की, "रावसाहेब, आपल्याला पाहिजे असल्यास, आपण आत्ताच्या आत्ता एक निबंध लिहायला सांगा. मी माझ्या बक्षीस मिळालेल्या निबंधाइतकाच चांगला निबंध येथल्या येथे लिहून दाखवतो." मग साहजिकच सगळीकडे झाली, 'तेरी चूप, मेरी भी चूप!'

* * *

## ३. एम. ए. होईन तर खरा आगरकर

गोपाळ गणेश आगरकर व दत्तात्रय विष्णू भागवत हे कऱ्हाडचे शिक्षण झाल्यावर, अकोला येथे सदाशिवराव भागवतांकडे राहून इंग्रजी शिकू लागले. अकोल्याच्या हायस्कूलचे मुख्याध्यापक त्या वेळी रा. ब. विष्णू मोरेश्वर महाजनी होते. एक दिवस शाळेत यावयास गोपाळला थोडा उशीर झाला. तेव्हा महाजनी म्हणाले–

"तुमच्या हातून वेळेला शाळेत येणे होत नाही; मग तुमच्या हातून होणार आहे काय?"

"आपल्याच सारखा एम. ए. होईन तरच नावाचा गोपाळ गणेश आगरकर!" असे उत्तर देऊन गोपाळ ताडकन रिकामा झाला आणि मग, "मामी (सदाशिवराव भागवतांच्या पत्नी) बाहेर गेल्या असल्याकारणाने घरी स्वयंपाक करून आणि सगळ्यांना वाढून, नंतर स्वतः जेवावयास लागल्याने वेळ झाला," असा खुलासा गोपाळने केला.

प्रत्युत्तर रोखठोक देण्याच्या भरात आपण जे बोलून गेलो, ते हरिश्चंद्राने स्वप्नात दिलेल्या वचनाप्रमाणे खरे केले पाहिजे, याची आच गोपाळने घेतली व पुढे अनेक अडचणी सोसून तो एम. ए. झालाही!

* * *

## ४. 'राणी छाप' कोठून आणावयाचे?

मॅट्रिक झाल्यावर गोपाळने पुण्याच्या डेक्कन कॉलेजात नाव घातले! पण जेवणाखाण्याला व फी-पुस्तकाला लागणारे 'राणी छाप' (व्हिक्टोरिया

राणीचे राज्य त्या वेळी असल्यामुळे तिच्या छापाचे रुपये) कोठून आणावयाचे? आपल्या विद्यार्थ्याची महत्त्वाकांक्षा मार्गी लागावी, म्हणून अकोल्यास महाजनी मास्तरांनी, पाऊणशे रुपये जमवून गोपाळला आरंभी दिले होते. ते संपायच्या आत पुढील व्यवस्था होणे जरूर होते. अशा चिंतेत असता, एक जाहिरात गोपाळच्या हाती पडली. ती पुण्याच्या वक्तृत्वोत्तेजक सभेची होती. तिचा फायदा गोपाळरावांनी घेतला. तयारी बेमालूम केली. गोपाळरावांना पहिले चाळीस रुपयांचे बक्षीस मिळाले.

त्या चाळीस रुपयांच्या चकाऱ्यापकाऱ्या होण्यापूर्वीच गोपाळरावांनी आणखी एक पन्नास रुपयांचे पारितोषिक मिळवले. 'एकत्र कुटुंबापासून फायदे व तोटे' या विषयावर डेक्कन कॉलेजच्या संमेलनाने निबंध मागवला होता. त्यात गोपाळरावांचा कस पहिल्या क्रमांकाने लागला; पण गुलाबदाणीच्या शिंपडणीने का स्नान होते? पण म्हणून याचना? जातिवंत पीळ तोंड वेंगाडीत नसतो. दुसरा सदरा करायला कूस सापडेना, तेव्हा गोपाळरावांनी ढकलले कित्येक दिवस एकाच सदऱ्यावर! रात्रीच्या वेळी गुपचूप सदरा धुवावा आणि वाळत टाकावा; सकाळी उठले की चढवावे त्याला अंगात!

गोपाळराव असे दिवस कॉलेजात काढीत असता, एफ. ए. च्या परीक्षेच्या वेळी गोपाळरावांजवळ फीपुरतेही 'राणी छाप' नव्हते. तेव्हा त्यांनी नाटक लिहून पैसे मिळविण्याचे ठरविले! ठोकली त्यांनी मांडी. मानेवर खडा ठेवल्यासारखे लागले गोपाळराव नाटक लिहायला! ते कळले प्रा. केरूनाना छत्र्यांना!! विद्यार्थ्यांवर पोटच्या पोराप्रमाणे प्रेम करणारा तो परोपकारी. त्या पुण्यपुरुषाने भरले गोपाळरावांच्या परीक्षेच्या फीचे पैसे आणि घेतले गोपाळरावांच्या हातचे नाटक काढून!

"विद्यार्थिनः कुतः सुखम्?" अशा थाटात गोपाळराव बी. ए. व पुढे एम्. ए. झाले!

***

## ९. जन्माचा जोडीदार मिळाला



गोपाळराव बी. ए. च्या वर्गात असताना त्यांचे लग्न झाले. उंब्रजच्या कु. अंबुताई फडके– सौ. यशोदाबाई आगरकर झाल्या. जन्माची ही जोडीदारीण 'एकरूप सुखदुःखपणी!' होती; पण दुसरा जोडीदार लाभला तो आगरकरांचा आनुवांशिक दावेदार! तो म्हणजे 'दमा.' स्वजनभक्तिपरायण गोपाळराव! वडीलधाऱ्यांचा सहजप्रसाद असा तो 'दमा!' त्याला ते जपल्याशिवाय कसे राहतील!

'मित्र जयास म्हणविले, सुज्ञे त्यासी करू नये कपट!' या कवी वचनाप्रमाणे गोपाळरावांनी जन्मभर दम्याची बडदास्त राखली! इतकी की चारुदत्त गरिबीला म्हणाला तसे गोपाळराव दम्याला उद्देशून म्हणाले–

*"मित्रा दम्या रे वससी शरीरी।*
*माझ्याच तू मानुनी सौख्य भारी॥*
*परंतु वाटे मज दुःख मोठे।*
*मेल्यास मी जाशील सांग कोठे?॥"*

***

## ६. आईची आशा, मुलाचे वेड

'मुलगा कॉलेजात शिकतो आहे, परीक्षा देतो आहे, उद्या पैसे मिळतील व आपल्याला चार दिवस सुखाचे येतील.' गोपाळरावांच्या आईने अशी आशा बाळगली तर चुकले कोठे? पण पोराने भलतेच वेड घेतले. गोपाळराव बी. ए. झाले आणि डेक्कन कॉलेजात फेलो म्हणून नेमले गेले. तेव्हा आईची आशा सहजच फुलली; पण बहाद्दर चिरंजीवांनी आईला पत्र लिहिले :–

"आपल्या मुलाच्या मोठाल्या परीक्षा होत आहेत. आता त्याला मोठ्या पगाराची चाकरी मिळेल आणि आपले पांग फिटतील असे मोठाले मनोरथ आई, तू करीत असशील; पण मी आताच सांगून टाकतो की, विशेष संपत्तीची हाव न धरता, मी फक्त पोटापुरत्या पैशावर संतोष मानून सर्व वेळ परहितार्थ खर्च करणार."

सदर पत्र पोचल्यावर सरस्वतीबाई आगरकरांना कसे झाले असेल? कसे व्हावयाचे? 'चिंता करतो विश्वाची' म्हणून रामदास होणाऱ्या नारायण ठोसराची आई राणूबाई यांना जसे सतराव्या शतकात झाले, तसेच! इतिहासाची पुनरावृत्ती होते ती अशीच काही तरी!

* * *

## ७. रमण्यातल्या दक्षिणेसाठी नाही!

गोपाळराव आगरकर एम. ए. चा अभ्यास करीत असता, एकदा त्यांचे मामा रामचंद्र विष्णू तथा भाऊसाहेब भागवत यांच्या येथे कऱ्हाडास आले होते. तेथे कोंडो केशव ऊर्फ नाना सहस्त्रबुद्धे मास्तर, कृष्णाजी आबाजी गुरुजी वगैरे मंडळी फराळास आली होती. नाना मास्तरांनी गोपाळराव आगरकरास सहज विचारले, "आपण पुढे काय करावयाचे ठरविले आहे!"

भाऊसाहेब भागवत :– सबजज्जाची जागा याला योग्य आहे. कारण याला लिहिण्याची तशीच बोलण्याची हौस आहे. या साऱ्या हौशी या जागेवर आल्याने साधाणार आहेत, मामलेदारीत साधणार

नाहीत. शाळा खात्यात कोठे प्रोफेसर अगर हेडमास्तर झाल्यास मात्र साधतील; पण ते काय, रडवे खाते!

आगरकर :– हूं! कर्णाला छपरावर ठेवून कर्णाचे दातृत्व वर्णन करण्यासारखेच आहे हे! ज्यांच्यापासून चांगले मुन्सफ, मामलेदार, वकील, डॉक्टर, बॅरिस्टर निपजावयाचे, तेच जर रडवे खाते, तर मग माळावर ऊस लावण्यास काय हरकत आहे? माझी शिक्षक होण्याची इच्छा आहे; पण ती हल्ली चालू असलेल्या रमण्यात दक्षिणा उपटण्यासाठी नाही! लोकांत स्वतंत्र विचार उत्पन्न करून स्वोन्नतीचे मार्ग लोकांना दिसू लागतील, अशा प्रकारच्या शिक्षकाचे काम मला करावयाचे आहे.

राष्ट्राची रचना शाळा-शाळांच्या वर्गा-वर्गांतून होत असते, ही जाणीव गोपाळराव आगरकरांच्या ध्येयाचे मूळ होती.

* * *

## ८. गुरु-शिष्य संवाद

पुण्याचे न्यू इंग्लिश स्कूल. शनिवारचा दिवस. आगरकरांचा तास आला. विद्यार्थी उत्सुकतेने वाट पाहू लागले. घंटा झाल्यावर थोड्या वेळाने आगरकर वर्गात आले. आता, अभ्यासाला सुरुवात करणार, तर वेलणकर आपला उभाच!

"सर, मला काही विचारायचे आहे."

"विचार, खुशाल विचार. काय हवे तुला?"

"पण सर, तुम्ही रागावणार नाही ना? गोष्ट जरा खासगी आहे."

"अरे मला कळू दे तर खरे! इतका बिचकतोस का?"

"सर, काल जोगेश्वरीच्या देवळात सौ. आगरकरांनी सुवासिनींच्या खणानारळांनी ओट्या भरल्या."

"हो, भरल्या."

"पण सर, तुम्ही तर नेहमी सांगता की, मूर्तिपूजा अन् हे सगळे थोतांड आहे... अन् मग.. हे कसे?... सर जरा...."

"खुळा कुठला. मी म्हणजे काही सौ. आगरकर नव्हे. नवरेपणाच्या जोरावर मी माझी मते त्यांच्यावर लादू की काय? छट्!"

"सर, पण खणानारळांना पैसे तुम्हीच दिले की नाही?"

"जरूर! त्यांचे मत जोपर्यंत मला बदलता येत नाही तोपर्यंत त्यांच्या श्रद्धेप्रमाणे त्यांना चालू दिलेच पाहिजे. त्याकरिता जर काही खर्च करावा लागला, तर मला तो करावयाला नको का? हिंदू समाजात आर्थिकदृष्ट्या स्त्रिया परावलंबी असताना, त्यांच्या श्रद्धेची गळचेपी होऊ नये म्हणून कुटुंबाच्या कर्त्या माणसाने दक्षता नको का घ्यायला?"

"स्वतःचे मत त्या श्रद्धेविरुद्ध असले तरी?"

"तरीसुद्धा! तरच स्वतंत्र विचारांचा परिपोष होईल. व्यक्तीचा व्यक्तीवरील विनाकारण जुलूम टळेल आणि सामाजिक नीतीची शुद्धता राहील."

या संवादानंतर अभ्यास सरळ सुरू झाला.

* * *

## ९. 'अंतरी' निर्मळ असणारा गुरू

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर इंग्रजी सहावीत (हल्लीच्या दहावीत) असताना, नादारी मिळावी म्हणून त्यांचा अर्ज होता. आगरकरांची सुधारकी मते त्यांना आवडत नसत. पांगारकरांचे जुने वळण आगरकरांना पसंत नसे. तेव्हा आपल्या नादारीच्या अर्जाचा निकाल काय होतो, हे ऐकण्यासाठी पांगारकर जिन्यात उभे होते. माडीवर न्यू इंग्लिश स्कूलचे शिक्षक नादारीसाठी आलेल्या अर्जांचा खल करीत होते. त्या खलात एक आवाज उमटला– "छे! छे! पांगारकराला कशाला नादारी! तो सनातनी आहे. पेट्रिअट आहे."

त्यावर आगरकर उद्‍गारले– "वा! वा!! असेल की, तो पेट्रिअट असेल! सनातनी असेल!! आपल्याला त्याच्या मताशी काय करावयाचे आहे! त्याच्या अभ्यासातील गुणवत्ता नादारी देताना आपण पाहिली पाहिजे! तो हुशार आहे, अभ्यासू आहे."

आणि मिळाली की लक्ष्मण रामचंद्रांना नादारी!

* * *

## १०. पेरून ठेवावे, केव्हा तरी उगवते



डॉ. गर्दे यांच्या दवाखान्यात आगरकरांचे जाणे-येणे असे. डॉक्टरांचे कंपाउंडर गोविंदराव देवधर. त्यांचा आगरकरांशी परिचय. देवधरांनी त्या परिचयामुळेच आगरकरांना विनंती केली आणि त्यांचे धाकटे बंधू गोपाळराव देवधर यांना न्यू स्कूलमध्ये नादारी व अभ्यासाची पुस्तकेही मिळाली. गोपाळराव देवधर मॅट्रिक झाल्यावर गोपाळ आगरकरांनी गोविंदराव देवधरांची गाठ घेतली व उपदेश केला की, "भावाला कॉलेजात पाठव, मी सगळी मदत करीन; पेरून ठेव, केव्हा उगवेल याचा नेम नाही."

झालेही तसेच. गोपाळराव देवधर बी. ए. झाले आणि ना. गोखल्यांच्या भारत-सेवक-समाजामार्फत सहकारी चळवळीने कीर्तिपर्वतावर उगवलेही.

***

## ११. व्याकरणाच्या कारिका

व्याकरणासारखा, त्यातूनही संस्कृतच्या व्याकरणासारखा विषय तयार करावयाचा म्हणजे विद्यार्थिदशेत आगरकरांच्या जीवावर येई. पाठच करावयाचे, तर लक्षात राहावयास श्लोक चांगले, असा त्यांचा स्वानुभव होता. तेव्हा व्याकरणीय कारिका ज्याच्या त्यास करावयास आगरकर सांगत. मग–

"सिमिली झाल्यावरती, येते मेटाफर ती जाणा।
त्यावर पर्सोनिफिकेसन– तो चौथा ऽ लेगरी बाणा।
सिनेक्डीकोकी। उपमाअलंकारच की।।"

असेल वा-

"अँटिथम् प्रथमं चैव, एपिग्रं तु द्वितीयकम्।
तृतीयं हॅपरबोलम्च, क्लायमॅक्सं तु चतुर्थकम्।।"

असले हास्यरसोत्पादक साचे पाठाबरोबर तयार होऊन करमणूक होई.

भरीला खुद्द आगरकरांच्या विनोदाचा फुलोराही फुलत असे. गोपाळरावांनी एकदा 'फुटबॉल' (पायचेंडू) हा शब्द उच्चारला. पाटणकर या विद्यार्थ्याला तो 'फूड्बॉल' वाटला. त्याने त्याचा अर्थ 'लाडू की पिंड?' म्हणून आगरकरांना विचारले. त्यासरशी आपण उच्चारलेला शब्द पुन्हा स्पष्ट उच्चारून आगरकरांनी समजावून सांगितला आणि हसत हसत म्हटले– "सर्वत्र औदारिकस्य अभ्यवहार्यमेव विषयः!"– खादाडांना सगळीकडे लाडू, गडू अँ!!

***

## १२. पोरांत पोर, थोरांत थोर

मुलांशी मूल होऊन खेळण्यात गोपाळरावांना कमीपणा वाटत नसे. एकदा आगरकर महाबळेश्वरास सहकुटुंब गेले होते. संध्याकाळच्या वेळी अंगणात आपल्या मुलाच्या हातात दोन दोऱ्या देऊन त्याला घोड्यासारखे ते पळवीत होते. जरा वेळाने चिरंजीवांची लहर फिरली. चिरंजीव झाले

चाबुकस्वार व गोपाळराव झाले घोडा; पण हा घोडा पडला दमेकरी, त्यामुळे त्याला पळवत होते कोठे? तेव्हा मागच्या स्वाराने उडवला चाबूक अन् काय! श्री. गोविंदराव वासुदेव कानिटकर तेथे उभे होते. त्यांच्याकडे पाहून गोपाळराव हसले व म्हणाले–

"सामाजिक सुधारणा लवकर व्हाव्यात म्हणून शब्दांचे चाबूक मी समाजाला मारतो, त्याची नक्कलच हा यशवंत माझ्या पाठीवर करीत आहे."

* * *

## १३. चारुदत्ताचा अवतार

तांबे यांच्या वाड्यात आगरकर पुण्यास राहत असता त्यांच्याकडे एकदा चोरी झाली. सिटी पोलिस इन्स्पेक्टर स्मिथ यांनी तपास केला; पण मागमूस लागेना! चोरीस गेलेल्या मालापैकी दीडशे रुपयांचा माल आगरकरांचे स्नेही रा. सा. मेहेंदळे इंजिनिअर यांचा होता. तो आपल्या जवळ ठेवीसारखा होता. तेव्हा ठेवीचा रक्षक या नात्याने आगरकरांनी आपली नैतिक जबाबदारी ओळखून मेहेंदळ्यांची नुकसानभरपाई केली.

शूद्रक कवीने लिहिलेल्या मृच्छकटिक नाटकात, त्या नाटकाचा नायक चारुदत्त याच्या घरी चोरी झाली आणि त्याचा मित्र मैत्रेय भटजी याच्या हातून दुसऱ्याचेच (वसंतसेनेचे) दागिने चोरीला गेले. तेव्हा चारुदत्त म्हणाला, 'भिक्षा मागुनि दारोदारी फेडिन ऋण,' त्या गोष्टीची आठवण झाली लोकांस व चारुदत्तापेक्षा स्वतःच्या कमाईतील पैशांनी मेहेंदळ्यांची नुकसानभरपाई करणाऱ्या गोपाळराव आगरकरांबद्दल लोकांचा आदर दुणावला.

* * *

## १४. आर्यभूषण काकू

पुणे येथे शनिवारात 'काकूबाईंची खानावळ' असे. टिळक-आगरकर डोंगरीच्या तुरुंगातून एकशेएक दिवसांची शिक्षा भोगून आल्यावर, त्या

दोघांना काकूबाईंनी आदराने जेवावयास बोलावले. आपल्या देशभक्तीचा आदर करणारी खाणावळीणबाई पाहून आगरकरांना कौतुक वाटले. म्हणून त्यांनी 'केसरी'त तिला 'आर्यभूषणकाकू' म्हणून संबोधिले. मग ज्याच्या त्याच्या तोंडी काकूंचे तेच नाव झाले.

***

## १५. दुसऱ्याच्या पैशांवर चैन नाही!



किर्लोस्कर नाटक-कंपनीच्या हस्तपत्रिकांवर टिळकादिकांच्यासारखीच आगरकरांचीही सही असे. गोपाळरावांना नाटकाचा शोक लहानपणापासून! मुलांनी केलेल्या नाटकात त्यांनी कधीकधी भूमिकाही केलेल्या! असे असता, एकदा 'शापसंभ्रम' नाटक लागले होते. एका मित्राने आग्रह केला–

"गोपाळराव, चला आपण नाटक पाहायला जाऊ!"

गोपाळराव : मजजवळ पैसे नाहीत.

मित्र : अहो, मी देतो.

गोपाळराव : दुसऱ्याच्या पैशांवर मी मजा मारणार नाही.

मित्र : पुढे मागे, माझे पैसे परत द्या.

गोपाळराव : कर्जबाजारी अगर उसनवारी चैन, संसाराची कीड आहे.

मग मित्र काय बोलणार!

* * *

## १६. एकाच दमात दंड व माफी

प्रा. गोळे यांच्याकडे कोंडिबा नाफड हा एक 'प्यारा प्यून' होता. हा शिक्षकमंडळींचे 'मधल्या वेळच्या चहाचे' बिल महिन्याच्या महिन्याला वसूल करी. आगरकर चहा न घेणारे; पण त्यांच्याकडूनही गड्याने दोनदा वसुली केली! आगरकरांनी ते फारसे मनावर घेतले नाही; पण आगरकरांची आई मृत्युशय्येवर असल्याचे कळल्यावर, त्यांनी सदर्न मराठा रेल्वेवर ताबडतोब जाण्यासाठी टांगा आणावयास कोंडिबास सांगितले. कोंडिबाने एवढा उशीर केला की, आगरकरांनी धडपड करून पुण्याचे स्टेशन गाठले आणि तरीही कऱ्हाडकडे जाणारी त्यांची गाडी हुकलीच! त्यामुळे, गोपाळरावांची व आईची गाठ पडू शकली नाही. त्यामुळे आगरकरांना कोंडिबाचा राग आला. पुण्यास परत आल्यावर त्यांनी कोंडिबास रागाच्या भरात एक रुपया दंडही केला; पण लगेच त्याला तो माफही केला!

* * *

## १७. माथेफिरूंना भिऊ काय?

सुधारकपत्रात धार्मिक समजलेल्या बाबींवर कडक टीका येई. परिणाम असा झाला की, काही माथेफिरूंनी 'आम्ही तुमचा खून करू' अशा अर्थाची आगरकरांना पत्रे लिहिली. आगरकरांचे सहसंपादक गोपाळराव गोखले यांना त्या पत्रांची माहिती लागली. ते दोघेही त्या वेळी भाटवडेकरांच्या वाड्यात राहत होते. तेव्हा नित्यनियमाप्रमाणे चतुःशृंगीकडे फिरायला

जाण्याच्या बेतात असलेल्या आगरकरांस गोखले म्हणाले, "निदान काही दिवस तरी तुम्ही संध्याकाळी फिरायला जाणे सोडून द्या. परतण्याच्या वेळी अंधार पडलेला असायचा. तेव्हा काही माथेफिरूंनी मनात आणले तर...?"

आगरकर– "हे काय भलतेच सांगता तुम्ही मला! अहो, या माथेफिरूंच्या धमक्यांना भिऊन जर मी फिरायला जायचे बंद केले, तर उद्या सुधारक लिहायचे सोडून द्यावे लागेल मला!"

असे म्हणून बडगा घेऊन आगरकरांनी चतुःशृंगीचा रस्ता सुधारला. सुद्धा! 'अभयं सत्त्वसंशुद्धिः!' अशी असते.

***

## १८. वेडगळ विधी करणार नाही

आगरकरांच्या आई वरल्या. कऱ्हाडला आगरकर गेले. तेथे थोरले मामा भाऊसाहेब भागवत त्यांना म्हणाले, "क्षौरविधी करा."

आगरकर : "हा वेडगळ विधी मी करणार नाही."

भाऊसाहेब संतापून म्हणाले, "तर मग येथून चालता हो!"

गोपाळराव मुकाट्याने उठले आणि कऱ्हाडहून रातोरात पुण्यास निघून गेले. पुढच्या आपल्या सुधारकपत्राच्या अंकात 'वडीलपणाचा हक्क' असा लेख त्यांनी लिहिला. जुन्या-नव्यांचे भांडण अटळ आहे, नव्याने पड खाता कामा नये; पण जुन्यावर संताप न करता, त्यांची कीव करावी, असा त्या लेखाचा आशय होता. तो भाऊसाहेबांना थोडा दिलगिरीचा वाटला. तेव्हा त्यांनी गोपाळरावांस पत्र लिहिले की, 'आम्ही जुन्या मतांच्या अमलाखाली वाढलो. ती आमच्या हाडीमांसी खिळली. तुम्ही रागावू नये. सत्य वाटते तसे वागण्याचा तुमचा निश्चय पाहून तुमची स्तुती करावी, हे खरे! पण मनाला कसेसेच वाटते. आम्हाला सांभाळून घ्यावे.'

***

## १९. सुधारकाचा संपादक साधा?



सुधारकातून पाश्चात्त्य संस्कृतीचे भाष्य यावयाचे! त्यामुळे आगरकरांची मते क्रांतिकारक वाटावयाची. तेव्हा हा सुधारकाचा संपादक आहे तरी कसला, म्हणून एक गृहस्थ आगरकरांना 'पाहावयाला' आले. आगरकर त्या वेळी फर्गसन कॉलेजजवळील बंगल्यात राहत होते. तेथे फाटकाजवळ त्यांनी आपल्या लिहिण्यावाचण्यासाठी स्वतंत्र खोली बांधली होती. वरील गृहस्थ आले तेव्हा आगरकर त्याच खोलीत होते.

फाटकाजवळच्या खोलीतच ते गृहस्थ प्रथम डोकावले. तो त्यांना धाबळीची बाराबंदी घातलेला, पंचा नेसलेला, दुसऱ्या पंचाची टापशी बांधलेला, एक मध्यम वयाचा गृहस्थ दिसला. तेव्हा त्यांनी विचारले–

"सुधारकाचे संपादक आगरकर कोठे राहतात?"

"आपले त्यांच्याशी काय काम आहे?"

"काही विशेष नाही. त्यांची कीर्ती ऐकून त्यांना एकदा पाहावे म्हणून आलोय!"

त्या मध्यम वयाच्या गृहस्थांनी सांगितले की, "सुधारकाचा संपादक आगरकर तो मीच!"

त्याबरोबर भेटीला आलेल्या गृहस्थाच्या चेहऱ्यावर विस्मय आणि विरस तांडव करू लागले. ते गृहस्थ म्हणाले, "उगीच अशी माझी थट्टा का करता?"

आगरकर उत्तरले, "मी आपली थट्टा करीत नाही! खरोखर मीच तो आगरकर."

"स्त्रियांनी जाकिटे घातली पाहिजेत, असे प्रतिपादणारे सुधारकाचे संपादक आगरकर इतक्या साध्या राहणीचे असतील ही मला कल्पनाच नव्हती!" तो गृहस्थ ओशाळून उद्गारला.

* * *

## २०. शाबास वीरांनो, शाबास!

संमतिवयाचे एक विधेयक सरकारने आणले होते. त्या वेळी त्या विधेयकाला अनुकूल व प्रतिकूल, असे दोन पक्ष पुण्यात झाले. रणकंदनच माजले त्यांच्यात म्हणाना! पुण्याच्या क्रीडाभुवनात शंभर सुधारकांची एक सभा झाली. ते सर्व विधेयकाला अनुकूल होते. तेव्हा त्या सभेची उधळपट्टी करण्याच्या हेतूने, शेजारील कौला-घरावर शेण, विटांचे तुकडे वगैरे आयुधानिशी सज्ज झालेल्या पुराणमताभिमानी 'वीरांचे जमाव' पाहून, स्वतःला त्यांच्याकडून थोडी दुखापत झाली असताही आगरकरांनी ठणकाविले–"शाबास! वीरांनो, शाबास!! तुम्ही केवळ चालती बोलती प्रेते आहात, असे वाटत होते; पण तुमच्या आजच्या या सज्जतेवरून तुम्हाला मन आहे, तुम्हाला रागद्वेषादी विकार आहेत, हे उत्तम प्रकारे सिद्ध होते आणि आता या आमच्या हतभागी देशाचा अभ्युदयकाल फार दूर नाही, अशी मला आशा वाटू लागते."

प्रसंगाला साजेसा असा बावटा आगरकरांनी उभारताच विरोधक आपल्या ठिकाणीच चूर झाले.

* * *

## निरोप नि निरवानिरव

गोपाळराव आगरकरांची तब्येत १८९५ च्या उन्हाळ्यात विशेष बिघडली. दमा दम काढू देईना. कोरड्या हवेत जाण्याचा बेत जमला नाही. शेवटी १६ जून १८९५ रोजी गोपाळरावांची प्रकृती खाडकन कोसळली. रात्री झोप म्हणून कशी ती लागली नाही. घरातील माणसांना मग झोप कोठून? पहाटे गोपाळरावांना एक जुलाब झाला. चार वाजण्याचा सुमार होता तो, त्या वेळी ते मंडळींना म्हणाले, "मला झोप येत आहे. मी स्वस्थ निजतो." असे म्हणून गोपाळराव निजले ते निजलेच.

अडीअडचणींत उपयोगी पडावे म्हणून दहा रुपये व एक रुपयाची मोड जवळ बाळगण्याचा आगरकरांचा शिरस्ता होता. त्याला अनुसरून आणखीही एक गोष्ट या वेळी आढळली!!

आपले कितीही दारिद्र्य असले तरी आपल्या अंत्यसंस्काराबद्दल आपल्या मित्रांवर खर्च पडू नये म्हणून गोपाळरावांनी आपल्या पेटीत वीस रुपयांची एक पुरचुंडी बांधून ठेवली होती. तीवर एक चिठ्ठी लावली होती की, 'माझ्या प्रेतदहनार्थ.'

आगरकरांच्या मरणोत्तर गोपाळराव गोखल्यांना जेव्हा ही पुरचुंडी दिसली तेव्हा त्यांना रडूच कोसळले!!!

***

# आपल्याच शब्दांत आगरकर

## भ्रम दूर झाला

जांभळीसारखेच 'पिसा' या नावाचे दुसरे एक झाड आहे. पुष्कळ दिवस याचा जळणाशिवाय दुसरा काही उपयोग होत असेल, असे आम्हास वाटले नाही. केव्हा केव्हा असा तर्क मात्र करावासा वाटे की, याच्या स्पर्शाने किंवा रससेवनाने वेडेपण येत असेल. म्हणूनच यास 'पिसा' हे नाव देण्यात आले असेल! पण नुकताच आमचा भ्रम दूर झाला. मुंबईचे एक प्रसिद्ध डॉक्टर प्रकृतीच्या आरामासाठी गेल्या मे महिन्यात येथे (महाबळेश्वरास) आले होते. त्यांच्या घरी या झाडाच्या

पानांच्या बंग्या करून मुंबईस रवाना करण्याची खूप तारांबळ जेव्हा आम्ही पाहिली व रा. ब. महादेव वासुदेव बर्वे या सारख्यांसही या पानांच्या बंग्या करून बाहेर पाठवाव्या लागतात, असे आमच्या नजरेस आले, तेव्हा मात्र या टाकाऊ दिसणाऱ्या 'भिकार' झाडाला काही औषधीगुण असावा असे आम्हास वाटले आणि सृष्टीतील कोणतीही वस्तू निरुपयोगी असण्याचा संभव नाही, ती निरुपयोगी समजणे आपलेच अज्ञान होय, हा तत्त्वविचार मग आम्हास सुचला! चौकशीअंती असे समजून आले की, पिशाची पाने वाळवून त्याचे चूर्ण करून ठेवले आणि त्याची थोडी थोडी नित्य लापशी करून घेतली, तर शक्ती वाढविण्याच्या कामी तिची बरीच मदत होते. पिशाच्या ओल्या पानांच्या रसाची भेंडीच्या रसासारखी तार निघते, हाताला तो चिकट लागतो आणि चवीलाही भेंडीच्या रसासारखाच तो गिळगिळीत व बेचव आहे!

—महाबळेश्वर वर्णन.

***

## नानांचा निरोप

(केरोपंत) नाना (छत्रे) पेन्शन घेऊन डेक्कन कॉलेजातून बाहेर पडले, त्या दिवशी त्यांच्या पायावर डोकी ठेवून त्यांना कडकडून भेटताना गहिवर न सावरल्यामुळे, ज्या आम्हास विलक्षण रडू कोसळले, त्या आम्हास व त्या दिवशी कॉलेजात येण्यास घर सोडल्यापासून रडून रडून ज्यांचे डोळे सुजून गेले होते, त्या नानांस गुरुशिष्यामधील खऱ्या प्रेमाचा अनुभव आला. भांडारकर, आक्सनाम चाटफील्ड, पील वगैरे प्रेक्षक प्रोफेसरमंडळींस त्याचे स्पष्ट स्वरूप दिसले.

—केरो लक्ष्मण छत्रे.

***

## शास्त्रीबुवांचा मृत्यू

आता आता (१८८२) कोठे (विष्णू) शास्त्रीबोवांच्या परिपक्व बुद्धिमत्तेची फळे हवी तशी लोकांस मिळू लागली होती, तो त्यास करुणाविमुख मृत्यूने हरून नेले. हा केवढा दुःखाचा प्रसंग!! १८७९

च्या एप्रिलमध्ये विष्णुशास्त्री चाकरी सोडण्याच्या बेताने आपले चंबुगबाळे आटोपून पुण्यास आले. चार-पाच महिने काय करावे, कोणता धंदा काढावा अशा विचारात गेले. या सुमारास डेक्कन कॉलेजातील दोन-तीन गृहस्थांचा सरकारी नोकरी न करता स्वतंत्रपणे लोकोपयोगी एखादे काम करण्याचा निश्चय झाला. नोकरी सोडून गावात शास्त्रीबुवा येऊन बसले आहेत असे कळल्याबरोबर सदरहू मंडळी त्यांस जाऊन भेटली व उभयतांच्या विचारे एक शाळा काढण्याचा विचार झाला. त्याप्रमाणे १८८० च्या जानेवारी महिन्यात 'न्यू इंग्लिश स्कूल'या नावाने मोरोबादादा फडणीस यांच्या वाड्यात शाळा घातली... शाळेस पुरे वर्ष झाले न झाले तोच तिला आणखी एक-दोन गृहस्थ येऊन मिळाले. पाच-सहा मंडळी एका विचाराने व एका मताने वागत असल्यामुळे शाळेचे काम आटोपून आणखीही काही करता येईल, असे वाटल्यावरून शुद्ध इंग्रजी आणि शुद्ध मराठीत अशी दोन वर्तमानपत्रे काढण्याचा विचार झाला व त्याप्रमाणे ८१ च्या जानेवारीत 'मराठा' व 'केसरी' बाहेर आले.

कोणी हितचिंतके मित्र विनोदाने आमच्या गट्टीस ग्राज्वेट-पंचायतन, ग्राज्वेट-पांडव म्हणत... प्रथम लोकांना आम्हाविषयी अशी भीती होती की, द्रव्यसंबंधाने आमच्या आपापसात कलागती लागून आमची जूट फुटेल. पुढे बर्वे-प्रकरण येऊन धडकले तेव्हा तर कित्येकांना असे वाटले की, या ग्राजुएटांची फटफजिती होते! आणि आता तर आम्हापैकी एकाने परलोकास प्रयाण केले; तेव्हा आम्हाविषयी लोकांच्या मनात नाना तऱ्हेचे तरंग येऊ लागले आहेत यात नवल नाही; पण सर्वांनी एक गोष्ट लक्षात धरावी ती ही की, आम्ही जो उद्योग आरंभिला तो लोकांनी घोड्यावर बसविले, त्या रडतरावाची मनोवृत्ती धारण करून आरंभिली नाही... शास्त्रीबोवांचीच कथा काय; पण आम्हापैकी एक जरी तळावर राहिला तरी तो आम्ही सर्वांनी आरंभिलेला उद्योग अविच्छिन्नपणे चालविण्यास होईल तितकी खटपट करील.

विष्णू कृष्ण चिपळूणकर

***

## तुरुंग

पहिल्या दिवशी अन्न पुढे आल्याबरोबर त्याचा अमंगळ दर्प आम्हास दुःसह वाटला व तोंडात दोन-तीन शिते जाण्याबरोबर ओकारी आली. पहिले पंचवीस दिवस आम्हाला पराकाष्ठेचे जड गेले. कांदा, लसूण खाण्याची ज्यांना सवय नाही, त्यांची तुरुंगात फार उपासमार होते व त्याच मुळे १०१ दिवसांत टिळकांचे २४ पौंड आणि माझे १६ पौंड, मांस नाहीसे झाले!... पहिले काही दिवस संध्याकाळी कांद्या-बटाट्याची पातळ भाजी मिळे; पण पुढे एकदा जो मुळ्यांचा पाला लागला त्याने आमची बाहेर पडेपर्यंत पाठ पुरवली. ही भाजी इतकी खराब असते की, ती आम्ही कधीच तोंडात घातली नाही. सकाळच्या डाळीपैकी काही डाळ एका मडक्यात राखून ठेवून त्याबरोबरच संध्याकाळच्या भाकऱ्या किंवा रोट्या खात असू. तुरुंगात गेल्याबद्दल आम्हास कधीच वाईट वाटले नाही; पण तेथले अन्न पुढे आले म्हणजे मात्र वाईट वाटे. आम्हापैकी प्रत्येकावर अतिसाराची पाळी आली. पहिल्या पंचवीस दिवसांत टकोरे घासण्याशिवाय दुसरा काही व्यवसाय नव्हता. पाच-सात दिवस गेल्यावर एकसारखी मांडी ठोकून बसण्याचा इतका कंटाळा आला की, आम्हास सक्तमजुरीची शिक्षा होती, तरी आनंदाने दिवस गेला असता, असे वाटू लागले!... मग एके दिवशी... एक लेखी अर्ज घेऊन... जनरल सुपरिंटेंडंट डॉक्टर कुक्शोक यांनी आम्हास पुस्तके वाचण्याची व भाषांतरे करण्याची परवानगी दिली. त्यामुळे कारागृहवास आम्हाला फारसा भोवला नाही... पुढे पुढे जसजशी मेंदूची व शरीराची शक्ती क्षीण होत चालली, तसतसे वाचण्यात देखील मन लागेनासे झाले!

डोंगरीतील आमचे १०१ दिवस

***

## महाराष्ट्रीयास अनावृत पत्र

आपण आपल्या विचाराच्या विजयासाठी व प्रसारासाठी भांडत आहोत, असे प्रत्येकाच्या मनात वागत राहील, तोपर्यंत न्यायसभेत पक्षकाराचे भांडण भांडणाऱ्या वकिलाच्या दिखाऊ वैराच्या फार पलीकडे अशा दोन व्यक्तींचे वैर जाईल असे आम्हास वाटत नाही व आगरकर

आणि टिळक यांच्या वैराचे स्वरूप याहून भयंकर नाही... जेव्हा खुद्द आगरकरांच्या किंवा आगरकरांच्या निकट आप्तांच्या डोळ्यांस पाणी येण्यासारखी काही अनिष्ट गोष्ट घडेल, तेव्हा इतरांपेक्षा टिळकांस व जेव्हा टिळकांच्या घरी तसा अनिष्ट प्रकार घडेल तेव्हा आगरकरांस विशेष वाईट वाटून डोळ्यांत पाणी येईल व मतभेदांमुळे उत्पन्न झालेल्या वैराचा एका क्षणात विसर पडून, एक दुसऱ्याला मदत करण्यास सहज प्रवृत्त होतील!

... लोकांना आज ज्या गोष्टी प्रिय आहेत, त्या या हतभाग्य लेखकांस पसंत नसल्यामुळे... लोकांस अप्रिय पण पथ्यकारक असे विचार त्यांच्या मर्जीविरुद्ध त्यांच्या पुढे आणणे हेच आपले कर्तव्य... अशी त्यांची दृढ कल्पना झाली असल्यामुळे,... श्रद्धाळू पंडितमन्य देशाभिमानी म्हणवून घेणाऱ्या जनसमूहाच्या उपहासाचे आणि रोषाचे स्थान त्याने आपणास करून घेतले आहे... म्हणण्यासारखी द्रव्यानुकलता नसता, श्री शिवाजीराव महाराज होळकरांनी देऊ केलेली दरमहा पाचशे रुपयांची नोकरी ज्याने 'मला नको' म्हणून सांगितले;... आज दहा-अकरा वर्षे जो उत्साहपूर्वक शिक्षकाचा आणि लेखकाचा धंदा करीत आहे; कवडीची किफायत नसता ज्याने सात-आठ वर्षे सर्वत्र प्रसिद्ध केसरी पत्राचे 'रकाने' भरून काढले इतकेच नाही, तर एका दुर्दैवी संस्थानिकास सुदशा यावी, एवढ्याच बुद्धीने लिहिलेले लेख न्यायाधीशास अप्रशस्त वाटल्यामुळे त्यांनी दिलेली शिक्षा ज्याने आनंदाने साहिली;... सर्वतोमुखी निंदा होत असलेल्या सुधारणेचा व सुधारकांचा पक्ष लोकांस वाटत असल्याप्रमाणे दुर्बळ नाही, तर त्याचेच अखेरीस सर्वत्र साम्राज्य होणार आहे, असे युक्तिवादाने सिद्ध करून देण्यासाठी कोणत्याही गोष्टीची अनुकूलता नसता...नवीन (सुधारक) पत्राच्या उठाठेवीत जो जाणूनबुजून पडला; रूढ धर्माचारातील व लोकाचारातील व्यंगांचे निर्भयपणे आविष्करण घडत असल्यामुळे देशाभिमानी व धर्माभिमानी म्हणविणाऱ्या पत्रांतून होत असलेला शिव्यांचा व शापांचा प्रचंड भडिमार ज्याला व ज्याच्या निरपराधी स्त्रीला एकसारखा सोसावा लागत आहे; स्वमताचे मंडन व तदनुसार होईल तेवढे वर्तन करण्यासाठी आपल्या फार दिवसांच्या मित्रांचाच काय, तर रात्रंदिवस काळजी वाहून आणि कडेवर

व खांद्यावर खेळवून ज्यांनी लहानाचे मोठे केले अशा अत्यंत ममताळू व पूज्य आप्तांचाही दीर्घ रोष ज्याने आपणावर ओढवून घेतला आहे... अशा मनुष्याच्या लेखात कितीही प्रमाद होत असले व केवढीही कटुता असली, तरी ते समंजस मनुष्याच्या स्वल्प आदरास, निदान थोड्याशा अनुकंपेस तरी पात्र झाले पाहिजेत... त्यांनी तसे केले तर ठीकच आहे; पण नाही केले तरी त्यास विशेषसे वाईट वाटण्याचा संभव नाही. कारण सारे जग त्याच्यावर उलटले, तरी पुढील कविवाक्याचे स्मरण करून त्याला आपले समाधान करून घेता येते.

ये नाम कोचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः।।
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा।
कोलोह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी।।१।।

* * *

## आगरकरांचा संदेश

१) विचारासंबंधी कोणी कोणाची मुर्वत ठेवण्याची गरज नाही.

२) लोकांना संतुष्ट करण्याकरिता स्ववंचना करणे हे महापातक आहे.

३) एखादी गोष्ट आपणाला कितीही चांगली वाटली; तथापि दुसऱ्यांनी तिचा स्वीकार केलाच पाहिजे अशी सक्ती करण्याचा आपणास अधिकार नाही.

४) स्वभूमीत, स्वलोकात, स्व-आचारात व स्वधर्मात राहून अविचारी व अज्ञान देशबांधवांच्या निंदेस किंवा छळास न भीता, त्यांच्याशी कधी भांडून, कधी युक्तिवाद करून, कधी लाडीगोडी लावून अथवा सामर्थ्य असल्यास कधी त्यांना दटावून त्यांची सुधारणा करणे यातच खरी देशप्रीती, खरी बंधुता, खरा देशाभिमान, खरे शहाणपण व खरा पुरुषार्थ आहे.

५) सचेतन व अचेतन सृष्टीचा दास मी नाही, तर तिला दास करण्याचा, निदान तिच्याशी बरोबरीने वागण्याचा हक्क किंवा अधिकार मला आहे असा विचार मनुष्याच्या अंतःकरणात जागू लागला, म्हणजे त्याच्या खऱ्या सुधारणेस प्रारंभ होतो.

* * *

# गोपाळराव आगरकर चरित्र

टेंभू (ता. कऱ्हाड, जि. सातारा) येथील एक पुराणिक गणेशपंत (दातार) आगरकर यांचा मुलगा गोपाळ गणेश आगरकर महाराष्ट्राचा 'सुधारकाचार्य' झाला. कमालीच्या गरिबीमुळे, आईबापांपासून पाचव्या वर्षी शाळेसाठी आजोळी राहावे लागले. बाराव्या वर्षी इंग्रजी तीन इयत्ता झाल्या. खर्डेघाशी, शागिर्दी, पुढे कंपाउंडरी अशा नोकऱ्या करीत करीत आणि कऱ्हाडपासून रत्नागिरीपर्यंत सत्तर मैल पायी चालत गोपाळ गेला. बारा वर्षांच्या गोपाळने इंग्रजी पाचवीपर्यंत शिक्षण मिळवले. पुढे अकोल्यास मधले मामा सदाशिवराव भागवत यांच्याकडे घरचे काम करून, गोपाळरावास अकोला हायस्कूलमधून मॅट्रिक होण्याची संधी मिळाली.

पुढे स्वारी डेक्कन कॉलेजात गेली. निबंध लिहून, वक्तृत्व गाजवून आणि कित्येक दिवस एका सदऱ्यावर काढून गोपाळराव बी. ए. झाले.

एम. ए. चा अभ्यास करीत असता टिळक यांच्याशी विचारविनिमय करून देशसेवेस गोपाळरावांनी आपले जीवन वाहण्याचे ठरविले. पोटापुरत्या पैशावर भागवावयाचे असा त्यांनी निश्चय केला. भावी पिढीच्या शिक्षणासाठी 'न्यू इंग्लिश स्कूल' व 'फर्गसन कॉलेज' या संस्था त्यांनी नावारूपास आणल्या आणि प्रौढांच्या चालू पिढीला 'केसरी' व 'सुधारक' या वृत्तपत्रांच्या साह्याने जागे केले. राष्ट्राची रचना शिक्षणसंस्थांच्या वर्गावर्गांतून होते तशीच कर्त्या पिढीला जगातील वारे कसे वाहत आहेत, हे दाखवीत राहण्याने होते. तसे करताना, इंग्रजी राज्याबरोबर येथे आलेल्या पाश्चात्त्य सुधारणा हिंदुस्थानने स्वीकारल्या पाहिजेत, असे आगरकरांनी प्रतिपादले. त्यामुळे, त्यांच्या सुधारणा-सूचना रूढ धर्माविरुद्ध आहेत, अशा लोकांना वाटल्या, त्यामुळे एकदा तर शिमग्याच्या दिवसांत आगरकरांची 'जिवंतपणीच प्रेतयात्रा' निघाली.

पण रास्त गोष्टीस भितो कोण? आगरकर अशा गोष्टींनी डरले नाहीत आणि लोकांना अप्रिय पण पथ्यकर विचार सांगण्याचे आपले व्रत त्यांनी सोडले नाही. शाळा-कॉलेजात ते वत्सल आणि परोपकारी असे चांगले, विद्यार्थिप्रिय शिक्षक होते. त्यामुळे १८९५ सालीं ते वारले तेव्हा विद्यार्थिगण पितृवियोग झाल्यासारखा हळहळला.

***

## मनोमन आगरकर

१८५६ जुलै १४ स गणेशपंत व सौ. सरस्वतीबाई आगरकरांचे पोटी जन्म.

१८६१ ते ६८ कऱ्हाड येथे भाऊसाहेब भागवतांकडे आजोळी इंग्रजी तीन इयत्तांपर्यंत शिक्षण.

१८६९ कऱ्हाड मुन्सफ कचेरीत उमेदवारी (२) रत्नागिरीला पुढील शिक्षणासाठी पायी प्रवास.

१८७१ रत्नागिरीस शागिर्दी करून इंग्रजी पाचवी.

१८७२ कऱ्हाड दवाखान्यात कंपाउंडरची नोकरी; जूनमध्ये अकोल्यास प्रयाण.

१८७५ अकोला हायस्कूलमधून मॅट्रिक.

१८७६ वऱ्हाड-समाचाराचे मोबदल्याने लिहिणारे सहा महिने लेखक. डेक्कन कॉलेजचा विद्यार्थी, तरी एका राजकीय विषयावर निबंध लिहून विष्णुशास्त्री चिपळूणकरांची पसंती मिळविली.

१८७८ बी. ए. होऊन डेक्कन कॉलेजचे फेलो.

१८७९ एम. ए. चा अभ्यास चालू असता न्यू स्कूल काढण्याचा टिळक-चिपळूणकरांबरोबर बेत.

१८८१ एम. ए होऊन न्यू इंग्लिश स्कूलमध्ये आले व 'केसरी'चे संपादक झाले.

१८८२ कोल्हापूरच्या शिवाजी महाराजांना वेडे ठरवून त्यांचा छळ कारभारी बर्वे करतात, म्हणून कडक लिहिल्याबद्दल डोंगरीच्या तुरुंगाची शिक्षा.

१८८४ फर्गसन कॉलेजची स्थापना; डेक्कन एज्युकेशन सोसायटी निघाली.

१८८५ न्यू इंग्लिश स्कूलचे आगरकर सुपरिंटेंडंट.

१८८८ दसऱ्याच्या दिवशी सुधारक हे स्वतंत्र साप्ताहिक काढले.

१८९१ 'सुधारक' केसरीबरोबरीने वाढला.

१८९२ फर्गसन कॉलेजच्या इमारतीस सुरुवात.

१८९५ फर्गसन कॉलेजच्या इमारतीचा उद्घाटन समारंभ (२) सोमवार ता. १७ जून रोजी गोपाळराव आगरकरांचा परलोकवास.

* * *